सकाळ मंगळवार, १६ ऑक्टोबर २०१८

## गोंदिया

### 'शेतकऱ्यांनी शिवारफेरीत सहभागी व्हावे'

**गोंदिया, ता. १५ :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे तीनदिवसीय शिवारफेरी व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या शिवारफेरीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन हिवरा येथील कृषी विज्ञान केंद्राने केले आहे.

शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, या उद्देशाने विद्यापीठात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके तसेच कृषी अवजारे यांची थेट माहिती आणि प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी शिवारफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील शेतकरी २१ ऑक्टोबर रोजी शिवारफेरीत सहभागी होऊ शकतात. समूहाने सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांनी १८००२३३०७२४ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करावी, असे आवाहन कार्यक्रम समन्वयक डॉ. नरेंद्र देशमुख यांनी केले आहे.